


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २७२, मंगळवार १६ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## पारनेर तालुक्याला १२१ कोटी रूपये खरीपाचा पिक विमा

### खासदार नीलेश लंके यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**मागील सन २०२३ मधील पिक विम्यापोटी पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना १२१ कोटी रूपयांचा पिक विमा मंजुर झाल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. यापूर्वी १६ कोटी ५० लाख रूपयांचा सोयाबिन पिकासाठीचा विमा जमा झाला असून आता उर्वरीत पिकांसाठी १०५ कोटी रूपये असा एकूण १२१ कोटी रूपयांचा विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.**




कोणत्या पिकासाठी किती विमा याची मंडलनिहाय आकडेवारी लवकरच जाहिर करण्यात येणार आहे. तालुक्यातील हवामान तसेच नैसिर्गीक स्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ व्हावा यासाठी खा. नीलेश लंके यांनी शासनाकडे पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला होता. शासनाकडून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळावा यासाठी खा. लंके हे नेहमीच प्रयत्नशिल असतात. त्याचाच एक भाग म्हणून पिक विम्यासोबतच शेतकऱ्यांसाठी कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध वैयक्तीक लाभाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खा. लंके यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही पाठपुरावा केला होता.

मागील वर्षीच्या खरीप हंगामात मुग, सोयाबिन, बाजरी, तुर, कांदा, उडीद या ७१ हजार २५५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा ५७ हजार १८५ शेतक-यांनी विविध १ लाख ४८ हजार ८३४ आवेदनपत्रांद्वारे पिक विमा उतरविला होता.

दरम्यान, पिक विमा उतरविल्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबिनची अग्रीम रक्कम म्हणून १६ कोटी ५० लाख रूपये इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून उर्वरीत १०५ कोटी रूपये इतकी रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. पिक विम्यासंदर्भात काही अडचण असल्यास आपल्या पारनेर शहरातील संपर्क कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन खा. लंके यांनी केले आहे.

## संत निळोबाराय पालखी सोहळयात मुख्यमंत्र्यांचा सहभाग

### ■ पंढरीला येणाऱ्या भाविकांना सोयी, सुविधा देणार ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही



■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संत निळोबारायांच्या पालखी सोहळयात सहभाग घेतला.

**पंढरपूर : प्रतिनिधी**

**पंढरपूरच्या दौऱ्या दरम्यान संत परंपरेतील शेवटचे संत संत निळोबाराय महाराजांच्या पालखी सोहळयात करकंभ येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सहभागी झाले. हाती टाळ घेत हरीनामाचा गजर करीत शिंदे हे काही काळ पालखीसोबत चालले.**

मुख्यमंत्री शिंदे यांच्यासमवेत मंत्री गिरीष महाजन, दादा भुसे हे होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पंढरीला येणाऱ्या भाविकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटीबध्द आहोत. पंढरीच्या वारीनिमित्त संत निळोबाराय यांच्या पालखी सोहळयात पायी चालण्याचे भाग्य मिळाले. त्यातून जो आनंद मिळाला तो शब्दात वर्णन करता येणार नाही. मुख्यमंत्र्यांच्या सहभागामुळे वारकऱ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. यावेळी त्यांनी आषाढी यात्रेच्या नियोजनाची पाहणी करून प्रशासनास सुचनाही दिल्या.

संत निळोबारायांच्या पालखी सोहळयात सहभागी झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी चंद्रभागा नदीच्या पैल तीरावरील ६५ एकर जागेची पाहणी केली. या जागेवर अनेक दिंडया मुक्कामी आहेत. वारकऱ्यांच्या राहुटी, पिण्याचे पाणी तसेच इतर बाबींच्या व्यवस्थेची त्यांनी पाहणी केली. चंद्रभागा नदी पात्रात पाय धुउन पवित्र तिर्थ त्यांनी मस्तकी लावले. त्यानंतर वाळवंट, दर्शन रांगचीही मुख्यमंत्रयांनी पाहणी केली. दर्शन रांगेतील वारकऱ्यांशी संवाद साधून काही अडचण आहे का याची विचारणाही त्यांनी केली. त्यावर उत्तम सोय असल्याचे सांगत वारकऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मुख्यमंत्रयांच्या आगमनानंतर दर्शन रांगेतील वारकऱ्यांनी विठ्ठल-विठ्ठल असा जयघोष केला.

### मुख्यमंत्र्यांची बुलेट सफर

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरात बुलेट सफर करून विविध सोयी सुविधांची पाहणी केली. आमदार समाधान आवडे यांनी बुलेटचे सारथ्य केले. पावसाची रिमझीम सुरू असताना वारकऱ्यांची गर्दी लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी बुलेटवरून सफर करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.**

## आदिनाथ पठारेच्या मुसक्या आवळल्या !

### ■ जत्रा हॉटेल हल्ला प्रकरण ■ धोंड्या व सोन्या मात्र फरार

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील हॉटेल जत्रावर हल्ला करून हॉटेल चालक प्रविण भुकन यांच्यावर प्राणघातक हल्ल्याप्रकरणातील फरार आरोपी आदिनाथ पठारे यांच्या पारनेर पोलीसांनी मुसक्या आवळल्या आहेत. या गुन्ह्यातील आरोपी धोंडया जाधव व सोन्या उर्फ प्रथमेश सोनवणे हे दोघे मात्र अद्यापही फरार आहेत.**



चौदा दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी हल्ला करीत धोंडया जाधव व त्याच्या सहकाऱ्यांनी प्रविण भुकन व इतरांना हत्यारांनी मारहाण केली होती. त्यानंतर विशाल पठारे व शंकर पठारे या आरोपींना पोलीसांनी अटक केली होती. त्यांना सुरूवातीस पोलीस तर सध्या न्यायालयीन कोठडी देण्यात आलेली आहे. जेवणाचा दर्जा चांगला नसल्याचे कारण पुढे करून हा हल्ला करण्यात आला असला तरी व्यावसायिकांकडून खंडणी वसुल करण्याच्या प्रकारातून हा हल्ला करण्यात आल्याची बाब पुढे आली आहे.

या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी व्यावसायिकांनी स्वयंस्फुतीने निघोजचे व्यवहार बंद ठेऊन हरताळ पाळला होता. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या यावेळी झालेल्या सभेत खंडणीखोर आरोपींविरोधात मोक्कांतर्गत कारवाई करण्याची मागणी केली होती. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामसभेत मा. उपसभापती खंडू भुकन यांनी आरोपींविरोधात मोक्कांतर्गत कारवाई करण्याचा ठराव मांडला. तो सर्वानुमते संमत करण्यात आला आहे.आरोपींवरील कारवाईच्या याच मागणीसाठी लवकरच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेण्यात येणार आहे.

### धोंड्या सराईत गुन्हेगार

**या गुन्हयातील धोंडया जाधव हा सराईत गुन्हेगार असून पुणे जिल्हयामध्ये त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. पुणे जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या पावणेतीन कोटी रूपयांच्या लुटीमध्येही त्याचा सहभाग आहे. शिरूर, टाकळीहाजी परिसरात दहशत निर्माण करून व्यावसायिकांकडून हात उसणे पैसे घेऊन दहशत निर्माण करीत हे पैसे बुडविण्याचा धोंडयाच्या नेतृत्वाखालील टोळीचे उद्योग आहेत.**

### व्यापारी एकवटले

**जत्रा हॉटेलवरील हल्ल्यानंतर निघोजमधील व्यावसायिक एकवटले असून अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना विरोध करून त्यांच्यावर कठोर कारवाईसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची फेरनिवड करण्यात येणार आहे. प्रत्येक व्यवसायाचे सर्वेक्षण करून संघटन भक्कम करण्यात येणार आहे.**

## छगन भुजबळ शरद पवारांच्या भेटीला!

### मराठा आरक्षणावर चर्चा झाल्याची शक्यता

**मुंबई :प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भेटीसाठी सिल्व्हर ओक येथील निवासस्थानी दाखल झाले. भुजबळांच्या भेटीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पवारांनी प्रकृतीच्या कारणास्तव केवळ दोनच पूर्वनियोजित भेटी ठरवल्या होत्या. मात्र भुजबळ अचानक दाखल झाल्याने त्यांना तासभर वेटिंगवर ताटकळत बसावं लागले. या भेटीविषयी बोलताना भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी यांनी आरक्षणासंदर्भात भूमिका जाणून घेण्यासाठी भुजबळ पवारांच्या भेटीला गेले असावेत, असा अंदाज व्यक्त करतानाच भुजबळांचा अंदाज लागत नाही, असे ते बेधडक नेते असल्याची प्रतिक्रिया दिली.**

**प्रवीण दरेकर काय म्हणाले?**

महाराष्ट्राचं सध्याचे राजकारण जातीपातीत विभागले जात आहे. दोन समाजांमध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. अशा वेळी ती दूर करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला. सह्याद्री अतिथीगृहावर बैठक आयोजित करण्यात आली होती, परंतु शरद पवार यांची नेहमीच भूमिका राहिली, की हा पुरोगामी महाराष्ट्र आहे. नेमके ते सह्याद्री अतिथीगृहावरील बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यानंतर शरद पवारांविषयी वेगवेगळी वक्तव्य येऊ लागली. नेमकी त्यांची भूमिका काय, मराठा किंवा ओबीसी समाजाचे आरक्षण असो किंवा सगेसोयरे असो.छगन भुजबळ यांचा रोखठोक स्वभाव आहे. काल त्यांनी बारामतीतही हा सवाल विचारला. या परिस्थितीत शरद पवारांनी भूमिका घ्यावी, अशी विनंती ते करणार असतील, असं प्रवीण दरेकर म्हणाले.

महाराष्ट्रातील जनतेला आजही उद्धव ठाकरे, शरद पवार किंवा काँग्रेस नेते आरक्षणाच्या विषयाकडे नुसते लांबून पाहतात, भूमिका नाही, असे वाटतं. आरक्षण टिकवण्यासाठी सगळे एकत्र राहणार आहोत का? यासारख्या काही अनुत्तरित प्रश्नांवर एकत्र बसून मार्ग निघावा, अशी मुख्यमंत्र्यांची अपेक्षा आहे. हे समजून घेण्यासाठी भुजबळ गेले असावेत, असे दरेकर वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले.

**भुजबळांचा अंदाज लागत नाही**

दरम्यान, छगन भुजबळ यांना लोकसभा किंवा राज्यसभा निवडणुकात संधी न मिळाल्याने उर्वरीत पान ३ वर

## महसूल कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन; जिल्ह्यातील कामकाज ठप्प

**नगर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन पुकारण्यात आले असून या आंदोलनामुळे जिल्हयातील महसूल विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे. नगर शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी ठिय्या देत आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले.**



महसूल विभागाचे सुधारीत आकृतीबंध दांगट समितीच्या अहवालातील शिफरशीनुसार कोणत्याही संवर्गातील कर्मचारी यांची कपात न करता लागू करण्यात यावा, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार तात्काळ पदोन्नती देऊन आदेश निर्गमित करण्यात यावेत. महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजुर करून पुरवठा विभागातील पदभरतीमुळे रिक्त होणारे महसूल कर्मचारी यांना महसूल विभागात सामावून घ्यावे, वेतन देयके उणे प्राधिकार पत्रपावर काढण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, महसुल सहाय्यकाचा ग्रेड पे १ हजार ९०० वरून २ हजार ४०० करण्यात यावा, महसूल सहाय्यक व तलाठी यांना सेवांतर्गत एकसनाम परिक्षा पध्दती लागू करण्यात याव्यात, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांची अधिसुचना दि.३ फेब्रुवारी २०२३ नुसार तात्काळ अव्वल कारकून यांची वेतन निश्चिती करण्यात यावी, महसूल सहाय्यकाची सेवा ज्येष्ठता यादी केवळ उर्वरीत पान ३ वर









# प्रगतीमंत्र

## दहावीनंतरचे पर्याय...

**दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडे करिअर करण्यासाठी अनेक पर्याय असतात. परंतु दहावीनंतर आपण कोणता कोर्स निवडता यावर हे तुमचं पुढील भवितव्य अवलंबून असतं. दहावीनंतर विद्यार्थी विविध व्यावसायिक अभ्यासक्रम करू शकतात. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आयटीआय अभ्यासक्रमदेखील खूप लोकप्रिय आहेत. आयटीआयमध्ये बरेच ट्रेंड असतात, ज्यातून विद्यार्थी त्यांच्या आवडीचे विषय निवडू शकतात.**



### सायन्स

- पीसीएमबी : बारावीतील फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स आणि बायोलॉजी या चारही विषयांवर आधारित बायो केमिस्ट्री, बायो मेडिकल इंजिनीअरिंग, बायो टेक्नॉलॉजी, बायो इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी अशा विषयांकडे जाता येतं.
- पीसीएम : या विषयांनुसार आर्किटेक्चर, डिफेन्स, नेव्ही, इंजिनीअरिंग, पायलट ट्रेनिंग, टेक्नॉलॉजीकडे वळता येतं.
- पीसीबी : मेडिकल, व्हेटर्नरी सायन्स अ‍ॅण्ड ॲनिमल हजबण्डरी, पॅरामेडिकल कोर्सेस, ॲग्रीकल्चर सायन्स अशा विषयांसाठी हा ग्रुप उपयोगी पडतो.
- एव्हिएशन, फूड सायन्स, फोरेन्सिक सायन्स, एन्व्हायर्न्मेंटल सायन्स, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, लाइफ सायन्स, मॅथमेटिक्स यात पदवी अभ्यासक्रम करता येतो. हे सर्व कोर्स चार ते पाच वर्षांचे असून त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागते.

### आयटीआय

आयटीआय अभ्यासक्रम खूप लोकप्रिय आहेत. आयटीआयमध्ये बरेच ट्रेड आहेत, जे विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार निवडू शकतात. काही लोकप्रिय कोर्स असे : आयटी टर्नर, आयआयटी मेकॅनिक, आयटी वेल्डर, आयटी प्लंबर, आयटीआय इलेक्ट्रीशियन.



### फाइन आर्ट्स, परफॉर्मिंग आर्ट्स

आर्ट अ‍ॅण्ड क्रॉफ्ट, सिरॅमिक अ‍ॅण्ड पॉटरी, डान्स, ड्रॉइंग, फर्निचर अ‍ॅण्ड इंटेरिअर डिझाइन, म्युझिक, स्कल्प्चर अशा कलेशी संबंधित विषयांमध्येही करिअर होऊ शकतं. मात्र त्यासाठी विषयाची आवड आणि कौशल्य लागतं. लहानपणापासून या विषयांचा अभ्यास केला तर त्यात करिअरसाठी उत्तम संधी आहेत.

### बॅचलर इन डिझायनिंग

काळानुरुप प्रत्येक वस्तूचं डिझाइन बदलत राहतं. प्रत्येक वस्तू वेगळ्या पद्धतीने प्रेझेंट केली जाते. हे डिझाइन करण्यासाठी प्रोडक्ट डिझाइन, फर्निचर अ‍ॅण्ड इंटिरिअर डिझाइन, सिरॅमिक अ‍ॅण्ड ग्लास डिझाइन, ग्राफिक डिझाइन, ॲनिमेशन, व्हिडिओ कम्युनिकेशन अशा प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मात्र यासाठी केवळ चित्रकला पुरेशी नसून कल्पनाशक्तीची गरज असते.

### डिप्लोमा

दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अभियांत्रिकी विषयात डिप्लोमा करू शकतात. त्यासाठी दहावीत गणित व विज्ञान विषय विद्यार्थ्यांनी घेतलेले असावेत. हे डिप्लोमा कोर्स ३ वर्षांचे असतात. काही डिप्लोमा अभ्यासक्रमांची नावे अशी : डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग.डिप्लोमा इन टेक्सटाइल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन सिविल इंजीनियरिंग, डिप्लोमा इन आयसी इंजीनियरिंग, डिप्लोमा इन ईसी इंजीनियरिंग, डिप्लोमा इन माइनिंग इंजीनियरिंग. या डिप्लोमा अभ्यासक्रमांनंतर विद्यार्थ्यांना थेट इंजिनीअरिंगच्या पदवीला प्रवेश मिळतो.

### उद्योजक व्हा

करिअरसाठी तुमच्याकडे भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण फक्त नोकरी करण्याच्या विचाराने त्याकडे पाहू नका. मनात कायम जिज्ञासा ठेवली, झोकून काम केलं, चिकाटी, प्रामाणिकता, गणिती वृत्ती ठेवली तर व्यवसायातही यश मिळू शकतं. चांगल्या मार्गाने पैसे कमावण्याचा विचार आणि व्यवहारी वृत्ती ठेवली पाहिजे. तरुणांना स्वयंरोजगार निर्माण करता येईल, या हेतूने शासनाने पॉलिटेक्निक कोर्स सुरू केले. मात्र शासकीय तसंच खासगी संस्थांमधून बाहेर पडणारी मुले केवळ नोकरीचाच विचार करतात. स्वतः उद्योग सुरू करून इतरांना नोकरी देत नाहीत. त्यामुळे नोकऱ्यांचा तुटवडा निर्माण होतो.

## होमिओपॅथी अन् आयुर्वेद

**मेडिकलच्या क्षेत्रामध्ये ॲलोपॅथीशिवाय इतर शाखांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या काही वर्षांपासून लक्षणीय प्रमाणात वाढत आहे. होमिओपॅथी आणि आयुर्वेद या पद्धतीच्या माध्यमातून उपचार घेणाऱ्यांचे प्रमाणही वाढत आहे.**

'होमिओपॅथीच्या छोट्या गोड गोळ्या नियमितपणे घेणारे आज अनेक जण आहेत. पर्यायी औषध म्हणून होमिओपॅथीच्या गोळ्यांना मागणी आहे. होमिओपॅथीचे उपचार घेणाऱ्यांची संख्या जास्त आहे. या गोळ्यांचे कोणतेही साइड इफेक्ट नाहीत; तसेच होमिओपॅथीचे शिक्षण इतर शाखांपेक्षा तुलनेने स्वस्त आहे,' असे कोलकाता येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपॅथीचे संचालक एस. के. नंदा यांनी म्हटले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये 'बीएचएमएस'ला प्रवेश घेणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये विद्यार्थी 'बीएचएमएस'ला प्राधान्य देत नव्हते. मात्र, आता विद्यार्थी मोठ्या आवडीने या शिक्षणाकडे वळतात, असे नंदा यांनी सांगितले. दिल्ली, कोलकाता, भोपाळ, चेन्नई, तिरुअनंतपुरम या शहरांमध्ये होमिओपॅथीच्या शिक्षणाला मागणी आहे. सरकारच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेमध्येही होमिओपॅथीची डिग्री घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. होमिओपॅथी प्रॅक्टिससाठी ही सकारात्मक बाब म्हणावी लागेल. सुरुवातीच्या टप्प्यामध्ये दिल्ली आणि कोलकाता येथेच प्रवेश परीक्षा घेतली जात होती. मात्र, आता हैदराबाद, तिरुअनंतपुरम, भोपाळ, चेन्नई आणि मुंबईमध्येही प्रवेश परीक्षा घेतली जाते. डॉक्टर होण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांच्या प्राधान्यक्रमामध्ये 'बीएचएमएस'चा पहिला क्रमांक आहे, असेही नंदा यांनी सांगितले.

### आयुर्वेदाकडेही ओघ

अंदाजे तीन हजार वर्षांची परंपरा असलेल्या आयुर्वेदासाठीही सध्या पुन्हा चांगले दिवस आले आहेत. ॲलोपॅथी, होमिओपॅथी या शाखांसह आयुर्वेदाचे उपचार घेण्याकडे पेशंटचा कल असल्यामुळे या शाखेचे शिक्षणही मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. दिल्ली विद्यापीठातील आयुर्वेदिक कॉलेजचे प्राचार्य के. के. सिजोरिया यांच्या मते, या क्षेत्रातही काही वर्षांनंतर आयुर्वेदाच्या शिक्षणासाठीही सीईटी घेण्याची शक्यता आहे. खासगी क्षेत्रामध्ये सुरुवातीच्या काळात आयुर्वेदिक ट्रिटमेंट काहीशी 'लो प्रोफाइल' समजली जात होती; पण सध्या आयुर्वेदिक उपचारपद्धतीलाही पेशंटची पसंती असल्यामुळे या क्षेत्रातील शिक्षणाकडेही विद्यार्थी वळताना दिसत आहेत.

# मॅनेजरशी नातं कसं हवं?

**आजची ध्येयं, डेडलाइन आणि स्पर्धेच्या जगात इतकी धावपळ असताना ऑफिसमध्ये मॅनेजर सोबतचं कटू नातं आपल्या तणावामध्ये अजूनच भर घालू शकतं. त्यामुळे ऑफिसमध्ये नकारात्मक वातावरण तयार होतं. तसंच, ते आपल्या कामाच्या क्षमतेवर परिणाम करतं आणि मानसिकरित्याही त्रासदायक ठरतं. मॅनेजरसोबतचं नातं चांगलं ठेवणं हे 'रॉकेट सायन्स' नक्कीच नसतं. बॉसच्या नजरेत राहण्यासाठी सतत काम करणं किंवा हो ला हो मिळवण्यापेक्षा काही स्मार्ट टिप्स किंवा सवयी आपल्या वागण्यात आणल्या, तर आपलं काम सोपं होऊ शकतं...**



### बॉसला समजून घ्या

कोणत्याही ठिकाणी कामाला सुरुवात करताना आपल्या मॅनेजरच्या कामाची पद्धत समजून घ्या. त्यामुळे दोघांना एकत्र काम करताना येणाऱ्या अडचणी कमी होतील. जसं, की तुमचा बॉस ई- मेलवरच्या संभाषणाला प्राधान्य देतो, की तोंडी चर्चा जास्त प्रमाणात होतात? ऑफिसमध्ये आठवड्याच्या कामाचा सुरुवातीला एकत्र प्लॅन बनवून त्याप्रमाणे काम करायला आवडतं, की एक दिवस आधी कामं ठरवून ती पूर्ण करायला आवडतात? आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे बॉसच्या तुमच्याकडून असणाऱ्या अपेक्षा जाणून घ्या. काम करतानाच्या बॉसच्या सवयी, उद्दिष्ट्यं समजून काम केलं, तर तुमच्या दोघांची कामाची लय जुळून यायला वेळ लागणार नाही.

### डेडलाइन पाळा

काम करताना हे विसरू नका, की तुमचे मॅनेजरही कुणाला तरी उत्तर देण्यास बांधील असतात. त्यांनाही कामाचा तेवढाच ताण असतो. त्यामुळे कोणताही मॅनेजर त्याच्या टीममध्ये काम गांभीर्यानं घेऊन वेळेवर ती पूर्ण करणाऱ्यांना पाठिंबा देऊन त्यांची प्रशंसा करायला मागं- पुढं पाहत नाही; परंतु त्याचबरोबर एक गोष्टं लक्षात घ्या, की त्यांच्या मागण्या अवास्तव असतील किंवा दिलेल्या वेळेत काम पूर्ण करणं अगदीच अशक्य असेल तेव्हा त्यांना वेळीच स्पष्टपणे नकार द्यायला शिका.

### अडचणी आणि त्यांची उत्तरं

कोणालाही आपल्या टीममध्ये अडचणींवर मात करण्याऐवजी कायम त्यांची रडगाणी गात बसणारा सदस्य कधीच आवडत नाही. त्यामुळे कोणतीही अडचण असो, ती मांडताना त्याच्यावर मात कशी करता येईल याचे दोन- तीन उपायही घेऊन जा. त्यामुळे तुम्ही प्रश्नांवर अडून न बसता त्यावर मात करण्याची क्षमताही तुमच्यात आहे हे तुमच्या मॅनेजरच्या लक्षात येईल. ऑफिसमध्ये होणाऱ्या बदलांना सकारात्मकतेनं आत्मसात करण्यासाठी नेहमी तयार राहा. त्यामुळे कोणत्याही अडचणीवर तुम्ही सहजपणे मात करू शकता हा विश्वास तुमच्या स्वतःमध्येच तयार होईल.

### कामाची माहिती देत राहा

बॉसला आपल्याबद्दल विश्वास वाटावा अशी इच्छा असेल, तर वेळोवेळी आपल्या कामाविषयी माहिती त्यांना देत राहा. फक्त कामाच्या बाबतीतच नाही, तर आपल्याकडून एखादी चूक झाली किंवा कामाबाबत काही वाईट बातमी असेल, तरी त्यांना विश्वासात घेऊन त्याच्याबद्दल कळवा. शक्य असेल, तर रोजच्या कामाचा आढावा त्यांना देत राहा. रोजची तुमची प्रगती त्यांना समजेल असं पाहा. कोणत्याही मॅनेजरला आपल्या टीममध्ये असे विश्वासार्ह लोक हवेच असतात.

### जबाबदारी घेताना...

दिलेला शब्द नेहमी पाळा. एखाद्या कामाची जबाबदारी तुम्ही आपल्या अंगावर घेतली असेल, तर काहीही करून ते काम पूर्ण करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे हे लक्षात घ्या. बॉसनं तुमच्या कामावर विश्वास ठेऊन ते तुमच्यावर सोपवलेलं असतं, त्यामुळे त्या विश्वासाला तडा जाऊ नये याची काळजी तुम्हालाच घ्यायला हवी.

### कामातली नैतिकता...


ऑफिसमध्ये तुमच्या कामामध्ये खरेपणा आणि नैतिकता असेल, तर त्यामुळे आपले सहकारी आणि बॉस या दोघांसोबतही नातं चांगल्याप्रकारे तयार करू शकाल. जे, की तुम्हाला कायमस्वरूपी उपयोगी पडेल. आपल्या वरिष्ठांशी चांगलं नातं ठेवा; पण त्यांच्या कामात किंवा तुमच्याशी संबंध नसलेल्या गप्पांमध्ये सहभाग घेणं टाळा. नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा, की मेहनतीला पर्याय नाही. त्यामुळे कोणत्याही कामात आपली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न करा.

### हेही महत्त्वाचं...

शेवटी सगळ्यांत महत्त्वाच्या दोन गोष्टी. पहिली म्हणजे ऑफिसमध्ये वेळेवर पोहोचा आणि वेळेवर तिथून बाहेर पडायचा प्रयत्न करून काम आणि खासगी आयुष्य यांचा ताळमेळ ठेवा. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या ठिकाणी सोशल मीडियाचा वापर कटाक्षानं मर्यादित ठेवा.



# 'डील' करताना...



**आपल्या व्यावसायिक जीवनात वाटाघाटींना पर्याय नाही. कधी अधिक पगारासाठी तर कधी वेगवेगळ्या सोयी मिळवण्यासाठी, कधी हवं ते काम मिळवण्यासाठी या वाटाघाटी कामी येतात. त्या करताना अनेक गोष्टी लक्षात घेणं आणि करणं महत्त्वाचं असतं.**

किचनमध्ये एकच संत्रे उरले होते आणि दोन्ही शेफ ते कोणी घ्यायचे याकरीता भांडत होते. एका मोठ्या व्यक्तीच्या मेजवानीकरीता जेवण बनवण्याचे काम त्या दोघांकडे होते. ते संत्र कोणी घ्यायचे, यावर एकमत होईना. शेवटी एकाने तेथील मोठी सुरी घेऊन त्या संत्र्याचे दोन तुकडे केले. एकाने अर्धे संत्रे पिळून आपल्या डिशमध्ये घातले. खरे तर ते पुरेसे नव्हते; पण नाईलाज होता. दुसऱ्याने त्याचे वरचे साल किसून आपल्या पदार्थात घातले. त्याच्याकरीता देखील ते अपुरेच होते. दोघांना वस्तू मिळाली, तरी दोघांचे समाधान झाले नव्हते. दोघांनी एकमेकांशी बोलून आणि समोरच्याच्या नक्की काय अपेक्षा आहेत, हे समजावून घेतले असते तर? ते संत्रे सोलून, एकाने ते पूर्ण फळ, तर दुसऱ्याने त्याची साल घेतली असती, तर दोघांना जे हवे, ते दोघांनाही पुरले असते. दोघांनाही आपली आणि समोरच्याची परिस्थिती आणि लक्ष्य काय आहे, हे माहीत नसल्याने हा घोळ उडाला. वाटाघाटी करत असताना परिस्थिती आणि लक्ष यात गफलत झाली, तर वाटाघाटी यशस्वी होत नाहीत. मला जर विचारले, की उत्तम वाटाघाटी कोण करते, तर माझे उत्तर असेल, लहान मुले. ते योग्य वेळी प्रेम, लाडीगोडी, तर काही वेळा दुकानात भोकाड पसरून पालकांना इमोशनली ब्लेकमेल करून आपल्याला हवे ते पदरात पाडून घेतात. मग लहानपणी आपल्या सगळ्यांकडे असलेला हा गुण मोठे झाल्यावर अचानक अदृश्य कसा होते, हे कोडे आहे. गेले काही दिवस वाटाघाटी हा शब्द आपल्या सतत कानावर पडत आहे. टीव्ही, रेडिओ, फेसबुक, व्हॉट्स ॲपवरून याबद्दलचे वेगवेगळे विनोद, बातम्या सगळीकडे फिरत आहेत. आता कोण चुकले कोण बरोबरच्या गप्पा सुरू होतील; पण तरीही नोकरी मिळताना पगाराच्या आकड्यासाठी, वेगवेगळ्या सोयी मिळण्यासाठी, नवीन काम मिळवणे, ऑफिसमध्ये हवे ते काम मिळवणे, या सगळ्याकरीता आपल्याला दररोज लोकांशी वाटाघाटी कराव्या लागतात. काही फिसकटतातदेखील; पण यातून खूप शिकता येते. वाटाघाटी करत असताना मात्र काही गोष्टी लक्षात ठेवणे जरुरीचे आहे.



### समोरच्याचे म्हणणे ऐका

प्रत्येकाला स्वतःचा आवाज ऐकायला आवडतो, हे खरे असले, तरी वाटाघाटी करताना समोरच्याचे जास्त ऐका. ७०/३० चा नियम वापरा. ७० टक्के ऐका आणि ३० टक्के बोला. अनेकदा हे उलट होत असते. आजकाल ऐकण्याची कला लुप्त होत चालली आहे. समोरच्याचे बोलणे ऐकल्याशिवाय आपले मत देण्याने पदरात हवे ते न मिळण्याची शक्यता जास्त असते.

### अभ्यास करा

जेव्हा वाटाघाटी करायला जायचे, तेव्हा समोरच्याचा पूर्ण अभ्यास करा. त्यांच्या अपेक्षा काय? त्यांचे प्रेशर पॉईंट कोणते? त्यांच्या समोर काय पर्याय आहेत? समोरच्या माणसाचा अभ्यास केला असेल, तर तुमची बाजू तगडी होते. समोर कोण आहे, हे पाहिल्याशिवाय आणि पारखल्याशिवाय आपली स्ट्रॅटेजी ठरवू नये.



### मागणी करताय?

तुम्ही कशात समाधानी आहात, हे समोरच्याला माहीत नसते. तुम्ही ग्राहक असलात, तर शक्य असतील, त्यापेक्षा कमी पैसे द्यायची ऑफर करा. तुमचे ध्येय कमी असेल, तर तुम्हाला मिळणारे 'डील'देखील हवे त्यापेक्षा कमी असेल. तुम्हाला जे हवे आहे, ते का हवे आहे, या प्रश्नाचे उत्तर जर कोणत्याही वाटाघाटी सुरू करताना स्वतःला दिले, तर आपले ध्येय काय आहे, याचा अंदाज तर येईलच आणि वाटाघाटी करणे सोपे जाईल.

### बोलणी करण्याची तयारी ठेवा

कोणत्याही पर्यायाशिवाय वाटाघाटी सुरू करू नका. तुमच्या वाटाघाटीचा शेवट हा तुमच्या बाजूने किंवा सकारात्मक होईल असा विचार केला, तर 'नाही' म्हणण्याची शक्ती तुम्ही गमावून बसाल. वाताघाटींचा शेवट जर माझ्या मनासारखा झाला नाही, तर मी 'नाही' म्हणेन, असे म्हटल्यावर समोरच्याला देखील तुम्ही गंभीर आहात, हे जाणवेल. म्हणजे 'नाही' म्हणा, असे नाही; पण जर ती शक्यता गृहीत धरली नाही, तर केवळ डील करण्यासाठी जे समोरचा देईल, ते घेऊन समाधान मानावे लागेल.

## शॉर्ट न्यूज

### पिंपळवाडीत कृषिदुतांचे मार्गदर्शन

**प्रवरानगर :** ग्रामीण शिक्षण संस्था व महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी महाविद्यालय लोणी येथील अंतिम वर्षातीला कृषिदुतांकडून जनावरांच्या रोग व चारा व्यवस्थापन याविषयी पिंपळवाडी येथे मार्गदर्शन करण्यात आले. कृषिदूत ऋषांक मापारी, प्रथमेश गाडे, गौरव ठाकरे, कार्तिक परदेशी, शुभम जाधव, तेजस लाव्हरे यांनी सदर चर्चासत्राचे आयोजन केले होते. पशुसंवर्धन पदविका विद्यालय, फत्याबादचे प्राचार्य डॉ. दादासाहेब मोकाटे व डॉ. गोरक्षनाथ अंत्रे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

### कोपरगांव बेट भागात वृक्षारोपण संपन्न

**कोपरगांव :** न. पा. शिक्षण मंडळ शाळा क्रमांक ५ वतीने कोपरगांव बेट भागात वन महोत्सव निमित्ताने वृक्षारोपण संपन्न झाले आहे. निसर्गाचा समतोल राखण्याकरिता वृक्षलागवड व संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. कोपरगांव बेट भागात नगरपालिका शाळा नं. ५, कोपरगावच्या परिसरात नगरपालिका व सामाजिक वनीकरण कोपरगावच्या सहभागातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम मुख्याधिकारी सुहास जगताप यांचे अध्यक्षतेखाली आणि वनपरीक्षेत्र अधिकारी निलेश रोडे, महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कार सन्मानित सुशांत घोडके परिसरातील नागरिक यांचे शुभहस्ते संपन्न झाला.

### सत्येन मुंदडा यांची चेअरमनपदी निवड

**नगर :** नुकत्याच अहमदनगर शहर सहकारी बँक, अहमदनगर येथे पार पडलेल्या अहमदनगर जिल्हा सहकारी बँक असोसिएशनच्या संचालक मंडळाच्या बैठकीत कोपरगावचे सत्येन सुभाष मुंदडा यांची एकमताने अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली तर उपाध्यक्षपदी पारनेर सैनिक बँकेचे शिवाजी व्यवहारे यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी सहकार खात्याचे अधिकारी सिनारे उपस्थित होते सत्येन मुंदडा यांच्या अध्यक्षपदाची सूचना सी ए गिरीश घैसास सर यांनी मांडले सभेसाठी जिल्ह्यातील विविध बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### कुलगुरू डॉ. पाटील यांच्या विरोधात उपोषण

**राहुरी :** मा कुलगुरू डॉ. प्रशांत पाटील यांच्याद्वारे मागासवर्गीय अधिकाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील दोन वरिष्ठ प्राध्यापक डॉ. मिलिंद अहिरे व डॉ. दिनकर कांबळे यांनी सहकुटुंब कुलगुरू यांचे कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. मागासवर्गीय अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांची खोटी चौकशी लावलेली असून सेवा जेष्ठता डावलून आपल्या मर्जीतील कनिष्ठ अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार दिला आहे. त्यामुळे प्रा. अहिरे व कांबळे यांनी उपोषण सुरु केले.

### खासगी बँकेतील अधिकाऱ्याला लुटले

**पाथर्डी :** खाजगी बँकेत काम करणाऱ्या तरुणाच्या दुचाकीला गाडी आडवी लावून चाकूचा धाक दाखवून सुमारे अडीच लाखांचा ऐवज लुटल्याची घटना मोहटादेवी रोडवर घडली आहे. याप्रकरणी श्रीनाथ सुरेश चित्रे (रा. शिरूर कासार, जि. बीड) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चार जणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. श्रीनाथ चित्रे हे खासगी बँकेच्या पाथर्डी शाखेत फिल्ड असिस्टंट म्हणून काम करत आहे. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर करीत आहे.

# हौशे, नवसे, गवसे येतील अन् खोटं नरेटिव्ह पसरवतील

## बारामतीकरांनो भावनिक होऊ नका | जनसन्मान रॅलीतून अजित पवारांचा विरोधकांवर निशाणा

बारामती : प्रतिनिधी

**बारामतीकरांनो भावनिक होऊ नका, विकासाचे राजकारण करायला शिका, भावनिकतेने विकास होत नसतो, ही बाब गंभीरतेने समजून घ्या, लोकसभेत चुकीच्या पद्धतीने तुम्हाला सांगितले गेले. पण तुम्हाला मी सांगतो, विधानसभेत देखील काही हौसे, नवसे अन् गवसे येतील अन् खोटं नरेटिव्ह पसरवतील, पण तुम्ही त्याला बळी पडू नका, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तर शरद पवार, सुप्रिया सुळे व युगेंद्र पवारांवर देखील नाव न घेता टोला लगावला.**



लोकसभेला आलेल्या अपयशानंतर आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाला उभारी देण्याच्या दृष्टीनं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रणनीती आखली आहे. त्यापार्श्वभूमीवर बारामतीमधून जनसन्मान रॅली या काढण्यात आली. यावेळी व्यासपिठावर खा. सुनेत्रा पवार, मंत्री छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

**लाडकी बहिणसाठी वर्षाला १८० कोटी**

अजित पवार म्हणाले, ''अडीच लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व महिलांना लाडकी बहिण योजनेचा फायदा मिळणार आहे. तीन गॅस सिलेंडरचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा होणार आहेत. बारामतीतील महिलांना लाडकी बहीण योजनेसाठी वर्षाला १८० कोटी रूपये मिळणार आहेत. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटी रूपये मिळणार आहेत. काही-काही राज्यांचे बजेट एवढे नाहीत, पण महायुतीचे सरकार हे लोकांचे सरकार आहे, प्रत्येकाला येथे न्याय दिला जाईल, असेही अजित पवार म्हणाले.

**तरच लाडकी बहीण योजना पुढे चालणार**

महिला सक्षम आणि आत्मनिर्भर होण्यासाठी लाडकी बहीण योजनेतून वर्षाला १८ हजार रूपये देण्याचं काम महायुती सरकारने केले आहे. पण, त्यासाठी विधानसभा निवडणुकीत महायुतीला निवडून द्यायचं आहे. तर, लाडकी बहीण योजना पुढे चालणार आहे. हौशे, नवशे, गवशे येतील, काही सांगण्याचा प्रयत्न करतील, विश्वास ठेवून नका. हा अजितदादा शब्दांचा पक्का आहे. त्यात कुठेही बदलणार नाही,'' असं अजित पवार यांनी म्हटलं.

**१४ हजार कोटी वीज बील माफ**

४४ लाख शेतकऱ्यांचे १४ हजार कोटी माफ केले आहेत. महावितरणचे कोणताही अधिकारी वीज बिल भरा म्हणून सांगण्यास येणार नाही. पीक, धान्य, फळे चांगल्या प्रकारे पिकवा. १ रूपये सरकार पिकविमा देत आहे. शेतकऱ्यांसाठी शून्य टक्के व्याजानं पिककर्ज सरकारनं दिलं आहे, असं अजित पवार यांनी सांगितलं.

## काव्यरंग

### झिम्माड

(बालकविता)



*पाऊसवाऱ्याचा वाढलाय जोर*
*थुईथुई वनात नाचतोय मोर*

*फांदीवर डुलतंय पान अन् पान*
*झाडांच्या फांद्या झुलवती मान*

*ओढ्यानाल्यांतून वाहते पाणी*
*डोहात बेडूक गातात गाणी*

*नदीच्या काठी गवताची दाटी*
*गवताच्या दाटीत फुलांच्या भेटी*

*झाडतात अंग भिजले पक्षी*
*झाडांवर शोभे सुरेख नक्षी*

*हिरवे झाले अवघे रान*
*उन्हाने घेतली हळुवार तान*

*सरला पाऊस, झिम्माड सरलं*
*शांत आकाश मनात उरलं!*

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# राजकीय प्रक्रिया आणि माध्यमांवर धनदांडग्यांचे नियंत्रण

## पद्मश्री पोपटराव पवार यांची खंत



नगर : प्रतिनिधी

**भारताचे राजकारण, राजकीय प्रक्रिया आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांवर मोजक्या राजकीय धनदांडग्यांनी नियंत्रण मिळवले आहे, अशी खंत पोपटराव पवार, डॉ. श्याम पालीवाल आणि निलिमा मिश्रा या तीन पद्मश्रींनी व्यक्त केली.**

स्नेहालय संस्थेच्या युवानिर्माण प्रकल्पाने आयोजित केलेल्या युवा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. देशापुढील वर्तमान आव्हाने आणि तरुणाईची सामूहिक जबाबदारी या विषयावर देशातील तीन नामांकित पद्मश्री पुरस्कार प्राप्त कर्मवीरांनी स्नेहालय संस्थेच्या स्नेहांकुर दत्तक विधान प्रकल्पाच्या प्रांगणात तरुणाईशी संवाद केला. या तिघांनी नमूद केले की, सत्ता आणि निवडणुका एवढेच सत्ताधारी आणि सत्ताशोधक गटांचे लक्ष्य बनले आहे. कर्जबाजारी शेतकरी, कष्टकरी, युवकांचे प्रश्न याकडे व्यवहारात कोणाचेही प्रामाणिक लक्ष नाही. अशा स्थितीत अस्वस्थ तरुणाईने एकीकडे रचनात्मक करावेच, पण भावनिक मुद्द्यांवरील राजकारण्यांनी शिजवलेल्या कुठल्याही द्वंद्वात अजिबात गुंतू नये, असे स्पष्ट केले.

(पान १ वरुन)

### छगन भुजबळ शरद पवारांच्या भेटीला!

ते पक्षात अस्वस्थ असल्याच्या चर्चा होत्या, या भेटींचा त्याच्याशी काही संबंध असेल का, असा प्रश्न प्रवीण दरेकर यांना विचारला असता, छगन भुजबळांच्या अस्वस्थतेविषयी काही सांगता येत नाही, मात्र त्यांचं राजकारण नेहमीच सनसनाटी राहिलं आहे. ते अस्वस्थ असतात, पुन्हा जोरात बाहेर पडतात. अशावेळी त्यांचा अंदाज लागत नाही, बेधडक असा तो नेता आहे. त्यामुळे अस्वस्थ आहेत की ओबीसी मराठा आरक्षणासंदर्भात भूमिका जाणून घ्यायची आहे, हे ते परत आल्यावरच समजू शकेल, असे दरेकर म्हणाले.

### महसूल कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन; जिल्ह्यातील कामकाज ठप्प

महाराष्ट्र महसूल आर्हता परीक्षा नियम १९९९ मधील तरतुदींनुसार करण्यात यावी, महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची सेवा पुस्तिका लेखाधिकारी वेतन पडताळणी पथकाऐवजी समकक्ष असलेल्या महसूल विभागातील नियुक्त लेखाधिकारी यांचे वेतन पडताळणीचे अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावी, अव्वल कारकून या संवर्गाचे पदनाम बदलून सहाययक महसुल अधिकारी असे करावे, नायब तहसिलदार संवर्गाचा ग्रेड वेतन ४ हजार ८०० करण्यात यावा, अव्वल कारकून यांना मंडळ अधिकारी पदावर अदला बदली धोरणानुसार पद स्थापना देण्यात यावी, नायब तहसिलदार पदासाठी अव्वल कारकून, मंडळ अधिकारी यांच्याकरता पदोन्नती विभागीय परीक्षा सरळसेवा याबाबत ७०:१०:२० असे करण्यात यावे, चतुर्थ श्रेणी, शिपाई कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना तलाठी संवर्गामध्ये २५ टक्के पदोन्नती देण्यात यावी, कोतवाल पदांना चतुर्थ श्रेणी ड दर्जा देण्यात यावा व कोतवाल पदोन्नती कोटा वाढविण्यात यावा या मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

# श्रीरामपूर जिल्हा निर्मितीच्या मागणीसाठी श्रीरामपूर बंदला प्रतिसाद

## १५ ऑगस्टपर्यंत घोषणा करावी | अन्यथा मंत्र्यांना प्रवेश बंदी

श्रीरामपूर : प्रतिनिधी

**श्रीरामपूर जिल्ह्याची घोषणा करावी, अन्यथा मंत्र्यांना श्रीरामपूरमध्ये येऊ देणार नाही, असा एल्गार करीत श्रीरामपूर जिल्हा व्हावा, या मागणीसाठी स्वाभिमानी श्रीरामपूर जिल्हा कृती समितीच्या वतीने रविवारी श्रीरामपूरानी बंद पाळून आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. जर जिल्हा घोषित केला नाही, तर मंत्र्यांना तालुक्यात येऊ देणार नाही तसेच विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे.**




श्रीरामपूर जिल्ह्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी श्रीरामपूर जिल्हा कृती समितीसह सर्वपक्षीयांच्या वतीने श्रीरामपूर शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. त्यात सर्वसामान्य छोट्या मोठ्या दुकानदारांनीही या बंदमध्ये सहभागी होऊन जिल्ह्याच्या मागणीसाठी आपले समर्थन दिले. येथील सर्व व्यावसायिकांनी आपले व्यावसाय शंभर टक्के बंद ठेवले होते. नगर जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रस्ताव शासन दरबारी गेल्या चाळीस वर्षांपासून प्रलंबित आहे.

आकाराने १७ हजारावर चौरस किलोमीटर एवढा प्रचंड मोठा असलेला हा जिल्हा महाराष्ट्र राज्यातील आकाराने सर्वाधिक मोठा आहे. केंद्र सरकारच्या विविध योजना प्रस्तावित जिल्हा मानूनच श्रीरामपूर येथे राबवण्यात येत आहेत. त्यात विभागीय पोस्ट कार्यालय, तार व पासपोर्ट कार्यालय आदींचा समावेश आहे. तसेच येथे प्रशासकीयदृष्ट्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. सर्वांसाठी सोयीचा आणि मध्यभागी असल्याने विभाजनानंतर श्रीरामपूर हेच ठिकाण जिल्ह्यासाठी योग्य आहे. तसेच गुणवत्तेच्या आधारे श्रीरामपूर या शहराचीच शिफारस जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त नाशिक यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

केवळ राजकीय ईच्छाशक्ती आणि श्रेयवादामुळे हा प्रश्न गेले ४० वर्षे अडकून पडला. त्यासाठी सातत्याने विविध अराजकीय संघटनांचे आंदोलने सुरू आहेत. आता आगामी विधानसभेच्या तोंडावर सरकारपर्यंत आपला आवाज पोहोचवण्यासाठी पुन्हा हे आंदोलन सुरू झाले. गांधी चौकात आंदोलकांनी श्रीरामपूर जिल्हा झालाच पाहिजे, अशी घोषणाबाजी केली.

**...तर मंत्रालयासमोर आत्मदहन**

१५ ऑगस्टपर्यंत श्रीरामपूर जिल्हा मुख्यालय झाले नाही तर मंत्रालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला. जिल्हा मुख्यालय ही मागणी अनेक दियसांपासून प्रलंबित आहे. केवळ राजकीय इच्छशक्ती नसल्याने तिला मुर्त स्वरुप येत नाही. यासाठी प्रवरेपर्यंत दिंडी काढून महसूलमंत्री विखे पाटील यांच्याकडे मागणी करणे आदी निर्णय घेण्यात आले. दरम्यान आमदार लहू कानडे यांनी मागील अधिवेशनात विधिमंडळात हा प्रश्न उपस्थित केला होता.

**मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करू : माजी खासदार लोखंडे**

दिवसभर कुणीही आपले व्यावसाय सुरू केले नाहीत. त्यामुळे श्रीरामपूर जिल्हा मुख्यालय व्हावे, ही गेल्या ४० वर्षांपासूनची सर्वसामान्यांची तीव्र इच्छा असल्याचे या कडकडीत बंदने पुन्हा एकदा सिध्द झाले. माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी श्रीरामपूर जिल्हा मागणीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करू, असे मत माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी व्यक्त केले.






# पिक विम्यापोटी शेतकऱ्यांना १०५ कोटी रूपये मिळणार

## विश्वनाथ कोरडे यांची माहिती




■ तालुक्यातील शेतकऱ्यांना १०५ कोटी खरीपचा पिक विमा मंजुर झाल्याची माहिती विश्वनाथ कोरडे यांनी पत्रकार परीषदेत दिली.

**पारनेर : प्रतिनिधी**

**सन २०२३ या खरीप हंगामातील पिक विम्यापोटी तालुक्यातील शेतकऱ्यांना १०५ कोटी रूपये रक्कम मिळणार असल्याची माहिती भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

तालुक्यातील नैसर्गिक स्थिती पाहून शेतकऱ्यांना पिक विमा मिळावा यासाठी आपण वारंवार पाठपुवा केल्याचे सांगूनप कोरडे म्हणाले, राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना १०५ कोटीचा पिक विमा मिळवून दिल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे तसेच महायुती सरकारचे कोरडे यांनी अभार मानले.

कोरडे पुढे म्हणाले, २०२३ च्या खरिप हंगामात मुग, सोयाबिन, बाजरी, तुर, कांदा व उडीद या पिकांच्या ७१ हजार २५५ हेक्टर क्षेत्राचा १ लाख ४८ हजार ८३४ अर्जांद्वारे पिक विमा उतरविला होता. हा पिक विमा भरताना शेतकऱ्यांनी एक रूपया तर राज्य सरकारने २३ कोटी ९९ लाख १४ हजार ५८८ तर केंद्र सरकारने १६ कोटी ८३ लाख ८५ हजार ३७३ रूपये अशी एकूण ४० कोटी ८४ लाख ४८ हजार ७९६ इतकी रक्कम भरण्यात आली होती. तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबिन पिकाची १६ कोटी ५० लाख रूपये इतकी अग्रीम रक्कम यापूर्वीच देण्यात आली असून १०५ कोटी रूपये लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी राहुल शिंदे, सुनील थोरात, सुभाष दुधाडे, पंकज कारखिले, अशोक चेडे, किरण कोकाटे, अर्जुन नवले, नवनाथ सालके, सोपान मुंजाळ, तुकाराम येवले, गोकुळ ठुबे, सखाराम भागवत यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# विमा कंपन्यांकडून दहा हजार कोटी रूपयांची लुट!

## पिक विमा कंपन्यांच्या लुटीविरोधात किसान सभेचा एल्गार

**पारनेर : प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांकडून एक रूपया मात्र शासनाकडून हजारो कोटी रूपये उकळणाऱ्या पिक विमा कंपन्या विमा देताना मात्र चलाखी करून हात वर करत असल्याचा आरोप कॉ. बन्सी सातपुते यांनी किसान सभेच्या बैठीत केला. कंपन्यांच्या या लुटीविरोधात आंदोलन करण्याचा इशारा या बैठकीत देण्यात आला.**

यावेळी बोलताना कॉ. सातपुते म्हणाले, पिक विमा भरूनही विमा मिळत नाही म्हणून शेतकरी विमा उतरविण्यास उत्सुक नव्हते. म्हणून शेतकऱ्यांना आकर्षित करण्यासाठी एक रूपयात विमा ही योजना आणण्यात आली. त्यातून शासनाकडून हजारो कोटी रूपये प्रिमीयम उकळला जातो.

या प्रसंगी किसान सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष बबन पाटील सालके, सचिव अप्पासाहेब वाबळे, सहसचिव हरिभाऊ गायकवाड, यांचा भाकप राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. स्मिता पानसरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. किसान सभेच्या वतीने दुधाला हमी भाव, शेतीमालाला किमान अधारभूत किंमत, पिक विमा प्रश्नी आंदोलन करण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला.



### शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली

**मागील वर्षी खरीपाच्या जोखीम रकमेच्या फक्त ६.२१ टक्के तर रब्बी हंगामात ०.२१ टक्के भरपाई देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात येऊन दहा हजार कोटी रूपयांची लुट पिक विमा कंपन्यांनी केली. सन २०२३ मध्ये नापिकीला कंटाळून २ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यास विमा कंपन्यांची नफेखोरी कारणीभूत आहे. दुध पावडरची आयात, कांद्यावरील निर्यात शुल्कामुळे शेतकरी अडचणीत आहे.**

**कॉ. बन्सी सातपुते**

यावेळी कैलास शेळके, बबन रावडे, चंद्रकांत चौधरी, भाऊसाहेब भगत, विजय थोरात, दादाभाऊ शिंदे, फिरोज शेख, शिवाजी करंजुले, बापू दिवटे, भागवत गायकवाड, कारभारी आहेर, संपत रावडे, अशोक गायकवाड, सुरेश होले, सुलाबाई आदमाने यांच्यासह इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. संतोष खोडदे यांनी प्रास्ताविक तर अंकुश गायकवाड यांनी आभार मानले.

# एमईटी स्कूलचे नॅशनल लेवल अबॅकस स्पर्धेत यश; ३४ विद्यार्थी टॉपटेनमध्ये



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर येथे ७ जुलै रोजी पार पडलेल्या २४ वी नॅशनल लेवल अबॅकस स्पर्धेत पारनेर तालुक्यातील सुपा येथील माऊली शिक्षण संस्थेच्या एमईटी इंग्लिश मिडीयम स्कूल व स्कायडेल इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत असे अभूतपूर्व यश संपादन केले आहे.**

तालुकास्तरीय पार पडलेल्या या स्पर्धेत अहमदनगर तसेच पुणे जिल्ह्यातून मिळून एकूण १८४० विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये एमईटी स्कूलमधील तब्बल ३४ विद्यार्थी टॉप १० मध्ये आले आहेत. अवघ्या पाच मिनिटांचा अवधी असलेल्या या स्पर्धेत चिमुकल्यांनी अतिशय कौतुकास्पद यश संपादन केले आहे.

यामध्ये प्रणव गोरख गवळी,काव्या निखिल ठोकळ, अरिहंत कळंबे, मोहम्मदनईम रियाज शेख, शिरीष चहांडे, तनुष्का काळे, प्राप्ती नितीन दळवी, आदर्श नामदेव गवळी, शाहिस्ता समीर शेख, तक्षिल नितीन दळवी, सर्वज्ञ लामखडे, खुशी संतोष दरेकर, दक्ष प्रीतम पिपाडा, यशराज धनेश व्यवहारे, अनन्या विश्वास शिंदे, रुद्र भरत लाकूडझोडे, निर्मल नीरज कश्यप, रिधान अनिकेत पठारे, ओमकार राजेंद्र गवळी, त्रिवेणी राजेंद्र गवळी, आरोही अमोल भोसले, झेनाब रियाज शेख, रितिका संदीप गाढवे, संचित संतोष वाघ, रोहित विनायक मांडगे, अरझान असिफ पठाण,अनुजा शिवाजी रोकडे, तनुष्का विजय जरे, संचिता संतोष वाघ, रिशांक सचिन साठे, रोनित संदीप लोहाडे, साई विकास आटपाडकर, सृष्टी गाढवे, अनुष्का अडागळे आदी विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे.
या सर्व विद्यार्थ्यांना एव्हरेस्ट अब्याकस अकॅडमीच्या सौ. सुवर्णा ठोकळ मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे, प्राचार्या मोनाली पठारे, उपप्राचार्या अनिथा शर्मा, शिक्षक गौरी पवार, संदीप गायकवाड, वैष्णवी रोकडे मॅडम यांनी अभिनंदन केले आहे.

# सर्वोत्कृष्ठ व्यवस्थापनाबद्दल गुरूमाऊली पोदार स्कुलला पुरस्कार

## शिवमावळे कृतज्ञता प्रतिष्ठानकडून गौरव

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरात नव्यानेच सुरू झालेल्या गुरूमाऊली पोदार लर्न स्कुलला शिवमावळे कृतज्ञता प्रतिष्ठाण संचलित एथॉस एज्युकेशन सोल्युशन्स या संस्थेमार्फत सर्वोत्कृष्ठ व्यवस्थापनाबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे सचिव मच्छिंद्र मते, प्रिन्सिपल विठ्ठल तुपे यांनी हा पुरस्कार स्विकारला.**

रविवारी पार पडलेल्या सोहळयात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी २०० विविध शाळांचे नामांकन प्राप्त झाले होते. त्यातून शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्कृष्ठ व्यवस्थापन पध्दती या विभागात गुरूमाऊली पोदार स्कुलला गौरविण्यात आले.

महाराष्ट्रात नामांकित असलेली पोदार लर्न ही संस्था सन १९२७ पासून कार्यरत आहे. पोदार पॅटर्न पारनेर शहरात राबविण्याचा ध्यास घेऊन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यंदापासून हे स्कुल पारनेरमध्ये सुरू केले असून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारी पारनेर तालुक्यातील ही पहिली शाळा असल्याचे संस्थेचे सचिव मच्छिंद्र मते यांनी सांगितले. या स्कुलमध्ये पाहिल्याच वर्षी १५०




विद्यार्थी शिक्षण घेत असून शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर अल्पावधीत संस्थेच्या व्यवस्थापनाची दखल घेऊन गौरव करण्यात आल्याचे मते यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष रामराव गाडेकर, सचिव मच्छिंद्र मते, खजिनदार काशिनाथ फंड, विश्वस्त रावसाहेब कासार, विकास दळवी, ऋषीकेश पवार यांनी संस्थेच्या व्यवस्थापनाबद्दल मिळालेल्या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला. व्यवस्थापनाबरोबरच विविध उपक्रमांमध्येही संस्था आपले योगदान देत असून कोणत्याही क्षेत्रात आमची संस्था सर्वोत्कृष्ठ आहे. संस्थेचे पदाधिकारी, प्रिन्सिपल विठ्ठल तुपे, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रत्येक क्षेत्रात सर्वोत्कृष्ठ कामगिरीसाठी सतत प्रयत्नशिल असतात असे रामराव गाडेकर यांनी सांगितले.

# हंगे विद्यालयाचा रिंगणसोहळा ठरला लक्षवेधी

## वृक्ष दिंडी, ग्रंथ दिंडीचेही आकर्षण

**हंगे : प्रतिनिधी**

**आषाढी वारीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या हंगे येथील न्यू इंग्लिश स्कुलच्या वतीने काढण्यात आलेल्या दिंडीचा रिंगण सोहळा लक्षवेधी ठरला. वृक्ष दिंडी तसेच ग्रंथ दिंडी या दिंडीचे आर्षण ठरले.**

न्यू इंग्लिश स्कुल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ व वृक्ष दिंडीचे खा. नीलेश लंके यांच्या पत्नी तथा जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांनी पुजन केले. यावेळी सरपंच राजेंद्र शिंदे, उपसरपंच नीता रासकर, सदस्य राजेंद्र दळवी, बाळासाहेब दळवी, जगदीप साठे, माया साळवे, ग्रामसेवक शेटवड, चेअरमन दळवी महाराज, पोपटराव इथापे, मनोहर दळवी, बाबा नवले, संजय ठोंबरे, प स सोंडकर, सागर दळवी, सुभाष ठोंबरे यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडीच्या माध्यमातून वृक्ष लागवडीचे आवाहन केले तर ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्व पटवून दिले. झाडे लावा जीवन वाचवा अशा घोषणांमधून वृक्षारोपणाचे महत्वही पटवून दिले. दिंडी गावामध्ये पोहचल्यानंतर वयोवृध्दांनीही दिंडीत सहभाग घेतला. त्यामुळे गावातील वातावरण भक्तीमय झाले होते. टाळ, मृदुंग, फुगडी खेळत पार पडलेला रिंगण सोहळा लक्षवेधी ठरला. प्रभारी मुख्याध्यापक सुदर्शन धस, संगिता घुले तसेच दोन्ही शाळांच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विठ्ठल रूख्मिणी व संतांच्या वेशभुषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.



### विठ्ठल नामाची शाळा भरली

**शाळा तर नेहमीच भरते. परंतू हंगे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल नामाची शाळा भरली. त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेला वृक्ष व ग्रंथ दिंडी सोहळा मोठया उत्साहात पार पडला. दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठल रूख्मिणी, वारकरी अशा वेशभुषा करून टाळ, मृदुंगाच्या गजरात, डोक्यावर तुळशी वृंदावन घेत फुगडया खेळत विठू नामाची शाळा संस्मरणीय ठरली.**

# उद्योजकतेचे नवीन क्षितिज गाठण्याचा विद्यार्थ्यांचा निर्धार !

## डी.बी.एम.स्कूलच्या विद्यार्थ्यांची क्राफटेड सोल्युशन कंपनीला शैक्षणिक क्षेत्रभेट

**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**येथील डी.बी.एम.स्कूल इ.१० वीच्या विद्यार्थ्यांनी पारनेर फाटा (वाडेगव्हाण)येथील क्राफटेड सोल्युशन कंपनीला नुकतीच भेट दिली.विद्यार्थ्यांना उद्योग प्रक्रियेबद्दल सखोल माहिती व अनुभूती मिळवून देणे हा या भेटीचा उद्देश होता. उद्योजकतेचे नवीन क्षितिज गाठण्याचा निर्धार यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.**

क्राफटेड सोल्युशन कंपनीत व्हॅलपूल ,एलजी ,हायर इत्यादी २० नामांकित कंपन्यांच्या प्रॉडक्टसाठी बॉक्स तयार करण्यात येतात. विद्यार्थ्यांनी या कंपनीची पॅकेजिंग प्रक्रिया जवळून पाहिली आणि समजून घेतली. कटिंग, पंचिंग, प्रिंटिंग,बॉक्स मेकिंग व क्वालिटी चेकिंग या सर्व प्रक्रियांचा अभ्यास केला.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी सिनियर मॅनेजर संतोष कुलकर्णी ,प्रोजेक्ट मॅनेजर सचिन देवरे , क्वालिटी मॅनेजर सागर तरटे , विशाल सर या सोबत कंपनीच्या कॉन्फरेन्स रूममध्ये प्रत्यक्ष संवाद साधला.यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या विविध प्रक्रियांबद्दल विस्तृत माहिती दिली आणि त्यांचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी नवीन कंपनी सुरु करण्यासाठी लागणारे परवाने, बँक लोन आणि इतर आवश्यक माहिती व्यवस्थित समजून घेतली तसेच मार्केटिंग प्रक्रियेबद्दल देखील माहिती मिळवली. कंपनी कशा प्रकारे आपले प्रॉडक्ट्स मार्केट करते व ती प्रक्रिया कोणत्या ठिकाणी होते, याबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

प्राचार्य जे.डी.मापारी यांनी नमूद केले की सदर क्षेत्रभेटीचा उद्देश विद्यार्थ्यांचे शैक्षणिक,व्यावसायिक आणि सामाजिक जीवन समृद्ध करणे हा होता. क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि नवीन प्रगत तंत्रज्ञानाची ओळख होते.यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होतो आणि ते भविष्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार होतात.
शैक्षणिक क्षेत्रभेट यशस्वी होण्यासाठी श्री.जाधव सर यांनी विशेष मेहनत घेतली तसेच इ.१० वीच्या वर्गशिक्षिका स्मिता मॅडमचीही मदत लाभली.यासाठी प्राचार्य जे.डी.मापारी सर व शितल मापारी मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.तसेच,कंपनीचे व व्यवस्थापक मंडळाचे आभार मानण्यात आले.



### क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

**डी.बी.एम स्कूल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत असते. ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली आणि त्यांना उद्योग क्षेत्रातील विविध पैलूंची सखोल माहिती मिळवून देणारी होती.**

**जे.डी.मापारी**
प्राचार्य,डीबीएम स्कूल

# पारनेर तालुक्यातील डॉक्टरांची पंढरीच्या वाटेवर आरोग्यवारी !

## वारकऱ्यांच्या सेवेत तल्लीन ! शंभर ते दीडशे दिंड्यात वैद्यकीय सेवा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन या तालुक्यातील वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेमार्फत आषाढी वारीतील वारकऱ्यांना दोन दिवस मोफत वैद्यकीय सेवा देण्यात आली होती.या आरोग्यवारीमध्ये पारनेर तालुक्यातील चारही झोनचे वैद्यकीय व्यावसायिक आपापल्या संपूर्ण टीमसह हजर राहून पंढरपूर येथे जाणाऱ्या संत तुकाराम महाराज दिंडी सोहळा व संत ज्ञानेश्वर माऊली दिंडी सोहळा या दोन्ही प्रमुख दिंड्यामधील जवळजवळ शंभर ते दीडशे दिंड्याना वैद्यकीय सेवा पुरवली.**

१५ ते २० दिवस पायी चालणाऱ्या या वारकरी पंथाच्या मोठ्या सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील व महाराष्ट्र बाहेरील देखील वारकरी कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यातून सहभागी होतात, विठू नामाचा गजर करत व ग्यानबा तुकाराम या संतांच्या नामाच्या उद्घोषात तल्लीन होऊन सर्व वारकरी हे दररोज वीस ते पंचवीस किलोमीटर मार्गक्रमण करत असतात. या संपूर्ण मार्गामध्ये ऊन, वारा ,पाऊस यापैकी कशाचीही तमा न बाळगता हे वारकरी विठू नामामध्ये दंग होऊन पुढे जात असतात. हा एक अवर्णनीय सोहळा पाहण्याचे व त्या सोहळ्यात सहभागी असलेल्या सगळ्या वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्याचे भाग्य याप्रसंगी पारनेर तालुक्यातील सर्व डॉक्टरांनी घेतले.

यावेळी संपूर्ण टीमसह आपल्या दवाखान्याचा सेटअप प्रत्येक ठिकाणी लावत त्यांनी त्या ठिकाणी संपूर्ण रुग्णांची सेवा केली. याप्रसंगी रुग्णांची साखर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी ,त्याचबरोबर निरनिराळ्या आजारांचे निदान करून रुग्णांना जागेवरच औषध उपचार करण्यात आले. वारी सुरू होऊन दहा ते बारा दिवस झाले असल्यामुळे बऱ्याचशा वारकऱ्यांना अशा औषध उपचाराची अत्यंत गरज होती आणि अशा या योग्य वेळी त्यांना औषधोपचार मिळाल्यामुळे सर्व वारकऱ्यांनी पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनचे आभार मानले. उपस्थित सर्व डॉक्टरांनी वारकऱ्यांसोबत भोजन केले व भक्ती रसाचा आनंद घेतला.




### दरवर्षी वारकऱ्यांना आरोग्य सेवा देणार

**पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ही संस्था नेहमीच सामाजिक भावनेने विविध उपक्रम राबवत असून वारीमध्ये आरोग्य सेवा देण्याचे दुसरे वर्ष असून यावर्षी अतिशय चांगल्या पद्धतीने आरोग्यवारी संपन्न केली आहे ,आगामी काळात याहीपेक्षा चांगल्या दर्जेदार आरोग्यसेवा वारकऱ्यांना पुरवण्याचा आमच्या सर्वांचा मानस असून त्या दृष्टीने पुढील वर्षी अजून काही चांगले बदल करण्यात येतील.**

**डॉ.भाऊसाहेब खिलारी**
अध्यक्ष (पी.टी.एम.पी. ए)


याप्रसंगी पीटीएमपीएचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी, उपाध्यक्ष डॉ.सोमेश्वर आढाव ,सचिव डॉ.संदीप औटी व त्यांच्या बरोबर डॉ.विजय पुरी, डॉ.अजित लंके, डॉ.सुनील कदम, डॉ.संतोष वाळुंज, डॉ.कांडेकर, डॉ सुनिल बेलोटे, डॉ.अशोक सरोदे ,डॉ. श्रीमंदिलकर, डॉ. बाळासाहेब झावरे, डॉ. बाळासाहेब घोगरे, डॉ. पांडुरंग थोरात, डॉ.किरण रोहोकले, डॉ. सौ.तनुजा रोहोकले, डॉ. सौ.वर्षा बांडे ,डॉ.सौ.सोनल तांबे ,डॉ.सौ. शारदा सांगळे, डॉ. सुभाष ढेरे ,डॉ. रमेश गवळी, डॉ.अजय येणारे, डॉ.सौ.शोभा गायके, डॉ.सौ. संजीवनी नवले, डॉ.सौ.भाग्यश्री दातीर, डॉ.सौ. दिपाली दाते, सौ. ईघे मॅडम, डॉ.श्रीकांत मेहेत्रे, डॉ. हनुमंत घायाळ, डॉ.जयवंत निमसे, डॉ.रविंद्र झावरे, डॉ. श्रीकांत पठारे, डॉ.भास्कर शिरोळे, चित्रपट अभिनेते डॉ. सुरेश आण्णा शिंदे त्याचबरोबर या सर्व डॉक्टरांना साथ करणाऱ्या त्यांच्या रुग्णालयाच्या सर्व स्टाफ उपस्थित होता.

संध्याकाळी सरडेवाडी (ता.इंदापूर) या ठिकाणी अथर्व मंगल कार्यालय येथे एकत्र येत सर्वांनी पारनेर तालुक्यातील सर्वात मोठी व वारीतील मानाची अशी श्री संत निळोबाराय दिंडी या मोठ्या दिंडीतील सर्व वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवली या ठिकाणी संध्याकाळी श्री. अंबुले सर यांच्या वतीने सर्व वारकऱ्यांना व डॉक्टरांना मासवडीचे भोजन देण्यात आले.रात्री या आरोग्यवारीची सांगता झाली.

# रांधे येथील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी सोहळा

**रांधे : प्रतिनिधी**

**संत बाळोबा महाराज भाकरे यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन स्वयंभू विठ्ठल रूख्मिणी जिथे प्रकट झाली अशी प्रती पंढरपूर म्हणून ओळखली जाणारी पवित्र भुमी, तमाम वारकरी विठ्ठल भक्तांची प्रतीपंढरी रांधे येथील स्वयंभू विठ्ठल रूख्मिणी मंदिरात बुधवारी आषाढी एकादशी उत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.**
विठ्ठल रूख्मिणी देवस्थान, सेनापती बापट सेवा मंडळ तसेच समस्त ग्रामस्थ विठ्ठलवाडी, रांधे यांच्या संयुक्त विद्यमाने देवषयनी आषाढी उत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून विठ्ठल भक्तीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



पहाटे साडेचार वाजता नितिनशेठ शंकर साबळे व विद्या नितिनशेठ साबळे यांच्या हस्ते अभिषेक आणि महापुजा व काकडा आरती, सकाळी ८ ते १२ विठ्ठलवाडी ते रांधे व पुन्हा विठ्ठलवाडी पायी दिंडी सोहळा, दुपारी १ ते ३ ज्ञानेश्वरी महिला भजन मंडळ , किसन नगर ठाणे यांचे सुश्राव्य भजन तसेच गावोगावांहून आलेल्या दिंडयांचे स्वागत, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ ह.भ. प.अमोल महाराज गहाणडुले यांचे हरि किर्तन, रात्री ९ वाजता एकदशी फराळ असे कार्यक्रमांचे स्वरूप आहे.

प्रति पंढरपूर विठ्ठलवाडी येथे एक आगळा वेगळा उत्सव सोहळा, पांडूरंगाच्या नामात लिन करणारा उत्सव सोहळा, मन प्रसन्न करणारा उत्सव सोहळा पार पडणार असून या सोहळयामध्ये भाविकांनी मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन स्वयंभू विठ्ठल रूख्मिणी देवस्थान ट्रस्ट, सेनापती बापट सेवा मंडळ आणि समस्थ ग्रामस्थ रांधे, विठठलवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com